साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे
विकास महामंडळ, मुंबई यांना भाग
भांडवली अनुदान. पुरवणी मागणीद्वारे मंजूर
निधी वितरण लेखाशिर्ष ४२२५०२२,
५४-गुंतवणूका

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीजीटी २०२१/प्र.क्र.९६/अर्थसंकल्प (विघयो),
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३० मार्च, २०२२

संदर्भ :-

१) वित्त विभागाचे शासन निर्णय / परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थसंकल्प-३. दिनांक १४.१०.२०२१, दि.२८.१.२०२२ , दि.३.२.२०२२ व दि.१७.३.२०२२
२) महामंडळे कार्यासनाची नस्ती क्र.पुरक-२०२१/प्र.क्र.१०/महामंडळे

प्रस्तावना –

वित्त विभागाकडून अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई यांना भाग भांडवली अनुदान या योजनेकरिता लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या, मुंबई या महामंडळाकडून राष्ट्रीय मागासवर्गीय वित्तीय विकास महामंडळ दिल्ली यांची थकित वसुलीसाठी मार्च, २०२२ मध्ये पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेल्या अनुदानाचा रु.८८२४.०० लाख इतका निधी नियंत्रक अधिकारी सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासाठी अर्थसंकल्पित झालेला व वित्त विभागाकडून BEAMS प्रणालीवर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई यांना भागभांडवली अनुदान या योजनेकरिता या महामंडळाकडून राष्ट्रीय मागासवर्गीय वित्तीय विकास महामंडळ दिल्ली यांची थकित वसुलीसाठी मार्च, २०२२ मध्ये पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेल्या अनुदानाचा निधी रु.८८२४.०० लाख इतका निधी नियंत्रक तथा सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.एन-४, ४२२५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च, ०१ अनुसूचित जातींचे कल्याण, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०१) भाग भांडवली अंशदान (०१) (०१) लोकशाही अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मातंग उन्नती महामंडळ) भाग भांडवली अंशदान (अ.जा.उ.यो) (कार्यक्रम) (४२२५००२२) ५४-गुंतवणूका" या लेखाशिर्षातील सन २०२१-२२ मधील अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. या व्यवस्थपकीय अनुदानावावत सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीकरिता प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधल नमुन्यातील देयकान्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांना



Scanned with CamScanner

संवितरण करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. सदर निधी खर्च झाल्यावर त्याबाबतचे खर्चाचे विवरण व उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता महालेखापाल कार्यालयास व शासनास सादर करावे.

४. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला उपरोक्त निधी / अनुदान वित्त विभागाच्या दि.२४.६.२०२१, दि.१४.१०.२०२१ दि.२८.१.२०२२, दि.३.२.२०२२ व दि.१७.३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील / परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधिन राहून वितरीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय अर्थसंकल्प नियम पुस्तिका नियम १७ व नियम १४२, तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील उपविभाग-एक नियम क्र. १४९ आणि वित्त विभागाचा शासन निर्णय/परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थसंकल्प-३, दि.२४.६.२०२१, दि.१४.१०.२०२१ दि.२८.१.२०२२, दि.३.२.२०२२ व दि.१७.३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये/ परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्रशान्त पुं. वाघ )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे स्वीय सहायक
२. मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय/ विशेष सहाय्य) यांचे स्वीय सहायक
३. अप्पर मुख्य सचिव (सामाजिक न्याय व विशेष) यांचे स्वीय सहायक
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. स्थानिक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
११. अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
१२. आयुक्त (समाजकल्याण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. सहसचिव / उपसचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नवी मुंबई
१५. वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प - ७) मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई
१८. निवड नस्ती, (अर्थसंकल्प/विघयो), मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner